**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
बॅकबे रेक्लमेशन योजनेच्या ब्लॉक III ते VI च्या मंजूर विकास योजनेमधील प्रस्तावित फेरबदलाबाबत कलम ३७(२) खालील अधिसूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
क्रमांक :- टिपीबी ४३१३ /४१४/ प्र.क्र. ३१/ २०१४/ नवि-११
मंत्रालय, मुंबई :४०० ३२,
दिनांक ५ **जून २०१७**

**शासन निर्णय** : सोबतची **मराठी व इंग्रजी अधिसूचना** शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(किशोर द. गिरोल्ला)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**
**मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.**
**मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव.**

**प्रति,**
(१) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
(२) आयुक्त, बृहन्मुंबई महागनरपालिका.
(३) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
(४) सह सचिव, तथा संचालक, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
(५) उप संचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.
(६) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची मराठी व इंग्रजी शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे साधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या १० प्रती नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२ व उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)
(७) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग (त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची सूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी)
(८) निवड नस्ती (नवि-११)

**Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.**

**Sanctioned modification to the Sanctioned Development Plan for BBRS Block III to VI under Section 37 (2) of the Act..**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department,**
**Mantralaya, Mumabi 400 032.**
**Dated : 5th June 2017.**

**NOTIFICATION**

**No.TPB 4313/414/CR-31/2014/UD-11:**

Whereas, the Government in the Urban Development Department vide Notification No. BBR/1082/CR-140/1687/UD-1 dated 15th June 1983, appointed Bombay Metropolitan Region Development Authority(hereinafter referred to as "Mumbai Metropolitan Region Development Authority" ) as a Special Planning Authority under Sub-Section 1(c) of Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") for areas comprised in Block III to VI of BackBay Reclamation Scheme in order to develop the lands in comprehensive manner and to provide necessary amenities.

And Whereas, the Development Plan of Back Bay Reclamation Scheme Blocks III to VI (hereinafter referred to as " the said Development Plan") has been sanctioned by the Government in the Urban Development Department under section 31(1 ) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No. BBR-1092/ 60/CR-6/92/UD-11 dated 3rd June 2000 and Notification No. BBR-1092/ 60/CR-6/92/UD-11 dated 17th March 2001;

And whereas, as per the said Development Plan the Plot No. 243-A of BBRS III is reserved for "Parking & Garden" and Plot No.239-A is reserved for "Parking";

And whereas, considering the increase in pollution by diesel operated vehicles and direction of Hon'ble High Court Mumbai in Writ Petition 1762/1999, to minimize pollution, accordingly to increase the usage of Compressed Natural Gas, the State Government issued direction under Section 37(1) of the said Act, vide order dated 24th August 2004, to submit modification proposal to the said Development Plan to reserve an area of 300 Sq.mtr. for "**CNG Outlet**" out of the Reservation on plot No. 243-A "Parking & Garden" ;

And whereas, the MMRDA vide its Resolution No. 1040 dt. 19/11/2004 has decided to initiate modification to the said Development Plan and has submitted the modification proposal vide letter dt. 20.6.2005 to the State Government to reserve an area of 300 Sq.mtr. for **"CNG Outlet"** (hereinafter referred to as "the said modification");

And whereas, after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, the Government is of the opinion that the said modification should be sanctioned with some changes :

Now, therefore , in exercise of the powers conferred by sub-section (2) of the Section 37 of the said Act., the Government hereby :-

(a) Sanctions the said modification as below :-

*" An area utpo 300 Sq.mtr. more particular shown on the plan attached herewith, is deleted from Reservation on plot No. 239-A "**Parking**" and Reservation on plot No. 243-A "**Garden and Parking**" of Block III and reserved for "**CNG Outlet**"*

(b) Fixes the date on which the said modification is published in the Official Gazette, as the date on which the said modification shall come into force;

(c) Directs the MMRDA that, in the schedule of modification appended to the Notification sanctioning the said Development Plan, after the last entry in schedule of modification, the above entry (a) shall be added.

Part plan showing the said modification shall be kept open for inspection by the general public during the office hours on all working days in the office of the Chief, Town and Country Planning Division, Mumbai Metropolitan Region Development Authority, Bandra-Kurla complex, Bandra (East), Mumbai 400 054.

This Notification shall also be published on the Government website- www.maharashtra.gov.in

**By order and in the name of the Governor of Maharashtra,**

**( Kishor D. Girolla)**
**Under Secretary to Government**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
बॅकबे रेक्लमेशन योजनेच्या ब्लॉक III ते VIच्या मंजूर विकास योजनेमधील मंजूर फेरबदलाबाबत कलम ३७(२) खालील अधिसूचना

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०००३२**
दिनांक - ५ जून **२०१७**

**क्रमांक :- टिपीबी ४३१३ /४१४/ प्र.क्र. ३१/ २०१४/ नवि-११**

**अधिसूचना**

ज्याअर्थी, शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र. बीबीआर/१०८२/प्र.क्र.१४०/१६८७/नवि-१ दिनांक १५ जून १९८३ नुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची ( यापुढे ज्याचा उल्लेख "मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" असा केलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केलेला आहे) चे कलम ४०, पोटकलम १(ग) अन्वये बॅक बे रेक्लमेशन योजनेच्या ब्लॉक III ते VI च्या क्षेत्राच्या परिपूर्ण विकासासाठी व आवश्यक सुविधा निर्माणासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, बॅक बे रेक्लेमेशन योजनेच्या ब्लॉक III ते VI क्षेत्राची विकास योजना (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे.), शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.बीबीआर-१०९२/६०/प्र.क्र.६/९२/नवि-११ दिनांक ३.६.२००० आणि अधिसूचना क्र.बीबीआर-१०९२/६०/प्र.क्र.६/९२/नवि-११ दिनांक १७.३.२००१ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) खालील तरतूदीनुसार मंजूर केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेच्या ब्लॉक III मधील भूखंड क्र. २४३-अे हा बगीचा व वाहनतळ यासाठी आणि भूखंड क्र. २३९-अे हा वाहनतळासाठी आरक्षित आहे.

आणि ज्याअर्थी, डिझेल इंधन वापरणा-या वाहनांकडून होणा-या प्रदुषणाचा विचार करता, तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.१७६२/१९९९ मध्ये दिलेले निदेश विचारात घेता, प्रदुषण कमी करण्यासंदर्भाने कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅसचा वापर वाढविणे आवश्यक असल्याने शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वये आरक्षण क्र. २४३-अे या आरक्षणामधील ३०० चौ.मी. क्षेत्र सीएनजी आऊटलेट करीता आरक्षित करण्याबावत दिनांक २४.८.२००४ रोजी निदेश दिलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठराव क्र. १०४० दिनांक १९.११.२०१४ अन्व्ये उक्त विकास योजनेमध्ये फेरबदल प्रस्ताव करणेचे ठरविले आणि त्यानुसार दिनांक २०.६.२००५ रोजीच्या पत्रान्वये ३०० चौ.मी. क्षेत्र हे सीएनजी आऊटलेटसाठी आरक्षित करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे(यापुढे याचा उल्लखे "उक्त फेरबदल प्रस्ताव" असा केलेला आहे)

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर प्रस्तावित फेरबदल काही बदलासह मंजूर करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झालेले आहे ;

आता त्याअर्थी. उकत अधिनियमाचे कलम ३७ पोटकलम (२) अन्वये प्राप्त अधिकारांचा आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करुन शासन :-

अ) प्रस्तातिव फेरबदल खाली नमूद असलेप्रमाणे मंजूर करीत आहे.
"ब्लॉक III मधील भूखंड क्र. २३९-अे वरील आरक्षण " **वाहनतळ** " आणि भूखंड क्र. २४३-अे वरील आरक्षण "**बगीचा आणि वाहनतळ**" या आरक्षणामधील नकाशावर दर्शविलेप्रमाणे ३०० चौ.मी. क्षेत्र " **सीएनजी आऊटलेटसाठी** " आरक्षित करणेत येत आहे,"

ब) सदर अधिसूचना शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून फेरदबल अंमलात येईल.

क) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास उक्त विकास योजना मंजूरीच्या अधिसूचनेच्या फेरबदलाच्या परिशिष्टामध्ये शेवटच्या नोदीनंतर, वरील (अ) प्रमाणे नोंद अंतर्भूत करणेचे निर्देश देत आहे.

प्रस्तावित फेरबदलाबातची अधिसूचना व भाग नकाशा हा प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा(पूर्व), मुंबई ८०० ०५४ यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये नागरिकांचे अवलोकनार्थ उपलब्ध असेल.

सदर फेरबदलाची सूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32
सत्यमेव जयते

(किशोर द.गिरोल्ला)
शासनाचे अवर सचिव.